॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(b), NAAC Re-accredited with 'B++' Grade

## CONVOCATION SECTION

Phone : (02462) 215294 website:srtmun.ac.in e-mail.:directorboee@gmail.com

जा.क्र./दीक्षान्त/२०२२–२३/५८६

दिनांक : २०/०२/२०२३

## दीक्षान्त समारंभा बाबत सुधारीत सूचना

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा पंचविसावा दीक्षान्त समारंभ रविवार, दिनांक १५ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठ प्रांगणात घेण्याचे ठरले होते, परंतू काही प्रशासकीय कारणास्तव सदरील नियोजित दीक्षान्त समारंभ दिनांक १५ जानेवारी २०२३ ऐवजी दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ शुक्रवार रोजी नियोजित वेळेत म्हणजेच सकाळी ११.०० वाजता घेण्याचे ठरले आहे. दीक्षान्त समारंभाच्या तारखेत झालेला बदल सर्व संबधितांच्या निदर्शनास आणुन दयावा. समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलपती मा.श्री. रमेश बैस हे भूषविणार असून विशेष अतिथि म्हणुन मा.श्री.डॉ.अनिल काकोडकर, कुलगुरु, होमी भाभा नॅशनल इंस्टीटयुट,अध्यक्ष राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान आयोग व माजी अध्यक्ष,अणुऊर्जा आयोग हे राहाणार आहेत. तसेच विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ. उध्दव भोसले व मा.प्र–कुलगुरु डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या उपस्थितीत हा समारंभ संपन्न होणार आहे.

सदरील दीक्षान्त समारंभात मा.ना.नितिन गडकरी,केंद्रीय मंत्री,रस्ते वाहतुक व महामार्ग भारत सरकार व मा.श्री. कमलकिशोर कदम माजी शिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना डी.लिट. ही मानद पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

या दीक्षान्त संमारभामध्ये सुवर्ण पदक प्राप्त विद्यार्थी व पीएच.डी.पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनाच पदवीप्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थिती मध्ये वितरीत करण्यात येणार आहेत. त्यामुळे सुवर्ण पदक प्राप्त विद्यार्थ्यांनी दिनांक २२ फेब्रुवारी २०२३ च्या अगोदर प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील समन्वय कक्ष, तळमजला येथे प्रत्येक्ष अथवा फोनद्वारे नांव नोंदणी करणे आनिवार्य आहे. ज्यांची नोंद २२/०२/२०२३ पर्यत झालेली आहे, त्याच विद्यार्थ्यांना कार्यक्रमाच्या दिवशी सुवर्ण पदक वितरीत करण्यात येतील. पीएच.डी.पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी दिनांक २३ फेब्रुवारी २०२३ रोजी कार्यालयीन वेळेमध्ये उपस्थितीची स्वाक्षरी करावी. या दिवशी शक्य न झाल्यास दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.०० ते ९.३० दरम्यान त्यांच्या उपस्थितीची नोंद व स्वाक्षरी पदव्युत्तर विभाग (P.G. Section) प्रस्तुत विद्यापीठ येथे करणे अनिवार्य आहे.

या दीक्षान्त संमारभामध्ये डी.लिट.मानद पदवी प्रमाणपत्र, सुवर्ण पदक प्राप्त विद्यार्थ्यांनाच पदवीप्रमाणपत्र प्रमुख उपस्थितांच्या हस्ते वितरीत करण्यात येणार आहेत. त्यानंतर पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना दुपारच्या सत्रात ठिक २.०० वाजता त्याच दीक्षान्त मंचावर पदवी प्रमाणपत्र वितरीत केले जाणार आहेत याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

Shri Didale
22.2.23

तसेच प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुलातील विद्यार्थ्यांनी, विद्यापीठ उपकेंद्र लातूर संकुलातील विद्यार्थ्यांनी व न्यू मॉडल डीग्री कॉलेज हिंगोली येथील ज्या विद्यार्थ्यांनी पंचविसाव्या दीक्षान्त समारंभासाठी उपस्थित राहुन पदवी/पदविका घेण्यासाठी अर्ज सादर केले आहेत, आशाच विद्यार्थ्यांना प्रस्तुत विद्यापीठातील पदवी वितरण विभागातून सकाळी ८.३० ते १०.३० दरम्यान पदवीप्रमाणपत्र वितरीत केले जातील.

यावेळी विद्यार्थ्यांना विद्याशाखानिहाय ठरविण्यात आलेले उपरणे घेणे आवश्यक आहे. त्यासाठी अनामत रक्कम रु.१५०/— लेखा विभागामध्ये जमा करणे आवश्यक आहे. या त्यांनतरच संबधितांना दीक्षान्त समारंभाच्या वेळेपूरते परीधान करण्यासाठी उपरणे दिले जातील. दीक्षान्त समारंभ संपल्यानंतर उपरण्यासाठी जमा केलेली अनामत रक्कम रु.१५०/— पैकी उपरणे शुल्कापोटी रु.१०/— वजा करुन उर्वरीत शुल्क रक्कम रु.१४०/— परत करण्यात येईल. यासाठी पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी भरलेल्या शुल्काची मुळ पावती व स्वतः चे ओळखपत्र **(I. D. Proof)** सोबत ठेवणे अनिवार्य आहे.

दीक्षान्त समारंभामध्ये उपस्थित राहून पदवी/पदवीका गृहण करणा—यां विद्यार्थ्यांनी पांढरा पायजमा/पॅट व पांढरा बुशर्ट (कॉलरसहित) तसेच, विद्यार्थीनींनी पांढरी साडी व पांढरा ब्लाउज किंवा पांढ—या रंगाच्या ओढणीसह पांढरा पंजाबी ड्रेस परीधान केलेला असावा.

**प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा विभागाच्या दिनांक १५.०९.२०२२ रोजीच्या परीपत्रकानुसार आपआपल्या महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलले आहेत, अशा विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ च्या विद्यापीठातील दीक्षान्त समारंभाच्या नंतर पदवी प्रमाणपत्र हस्तगत करुन एक महिन्याचे आत महाविद्यालयस्तरावर पदवी वितरण कार्यक्रम आयोजीत करुन पदवी प्रमाणपत्र वितरीत करण्यात यावेत. त्यामुळे सर्व संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी,तसेच सर्व प्राचार्यांनी त्यांच्या महाविद्यालयात घेण्यात येणा—या पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाची सूचना सर्व विद्यार्थ्यांना अवगत करुन द्यावी.**

**सदरील परीपत्रकाची नोंद घेवून उपरोक्त बाब सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन दयावी.**

वरीलप्रमाणे पंचविसावा दीक्षान्त समारंभ हा आपल्या विद्यापीठाचा महत्वपुर्ण सोहळा असल्यामूळे त्यास सर्व संलग्नीत महाविद्यालयाचे प्राचार्य,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती प्रार्थनीय आहे.

(डॉ. दिगंबर एम. नेटके )
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव :

०१.मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना देवून विनंती की, उपरोक्त पदवी प्रमाणपत्र वाटपा बाबतचा निर्णय विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा.

०२. सर्व संकुलाचे संचालक, यांना देवून विनंती की, उपरोक्त पदवीप्रमाणपत्र वाटपा बाबतची सूचना विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

०३. विभाग प्रमुख, प्रशासकीय व शैक्षणिक विभाग,प्रस्तुत विद्यापीठ.

Scanned with CamScanner